जयसिंगपूर नगरी दुमदुमली : हजारो शेतकऱ्यांची उपस्थिती

जयसिंगपूर, स्वाभिमानी नगरी : छत्रपती शाहू महाराजांनी वसविलेल्या जयसिंगपूर नगरीमध्ये प्रथमच राज्यव्यापी कृषी अधिवेशन, कृषी आणि पशु प्रदर्शन होत असल्यामुळे जयसिंगपूर शहरातीलच नव्हे तर पश्चिम महाराष्ट्रातील शहरातीलसुध्दा एक पर्वणीच ठरलेली आहे. हजारो शेतकऱ्यांच्या उपस्थितीने जयसिंगपूर नगरी दुमदुमून गेली असून शेतकऱ्यांच्या वेशभूषेवर आर्थिक जीवनदृष्टीवर आधारित असलेले देखावे आणि जीवंत चालते बोलते देखावे पाहण्यासाठी शहरातील नागरिकांनी गर्दी केली होती. या सर्वांमुळे जयसिंगपूर नगरी कृषी अधिवेशनामुळे स्वाभिमानी नगरी बनलेली आहे.

९ ते ३ मे रोजी जयसिंगपूर नगरीत कृषी प्रदर्शन संपन्न होत आहे. देशात अशा प्रकारचे शेतकऱ्यांचे नव्हे पहिलेच दालन, नवा उत्साह हे कृषी प्रदर्शन म्हणून पुढे येत आहे. शेतकऱ्यांचे अधिवेशन म्हणून एका आगळ्यावेगळ्या उपक्रम पहिल्यांदाच राबविण्यात येत आहे. त्यामुळे लाखो शेतकऱ्यांची उत्सुकता तिपटीला पोहचली आहे. पश्चिम महाराष्ट्रात ऊस आणि दूध आंदोलनाच्या माध्यमातून स्वाभिमानी शेतकरी संघटनेने आपले पाऊलखुणे खोलवर रुजवलेली आहेत. विधानसभेत व लोकसभेत शेतकऱ्यांच्या प्रश्नांविषयी पोटतीडकीने चर्चा होत राही. खासदार राजू शेट्टी यांच्या गाजावाजातून याचवेळी प्रथमच उस दरआंदोलन लोकसभेचे वातावरण तापवून सोडले होते. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर लोकसभेचे काम बंद पाडण्याचा पराक्रम करणारे खासदार राजू शेट्टी हे देशातील पहिलेच खासदार आहेत. स्वाभिमानी शेतकरी संघटनेची बांधणीच आंदोलनातून झालेली आहे. जयसिंगपूर नगरीत खासदार राजू शेट्टी, प्रदेशाध्यक्ष सदाभाऊ खोत यांच्या संकल्पनेतून प्रथमच शेतकऱ्यांचे सुले अधिवेशन भरत आहे. त्यामुळे पश्चिम महाराष्ट्रातील लाखो शेतकऱ्यांना याची प्रचंड उत्सुकता लागून राहिलेली आहे. या शेतकऱ्यांच्या खुल्या अधिवेशनासाठी शेतकऱ्यांची विविध प्रश्नांवर चर्चा केली जाणार असून शेतकऱ्यांचा गशुता काय असणार हेही यामध्ये ठरविले जाणार आहे. शेतकऱ्यांच्या हक्काचे व्यासपीठ म्हणून हे शेतकऱ्यांचे खुले अधिवेशन नक्कीच यशस्वी होणार यात शंकाच नाही.

पन्हाळा, शाहूवाडी तालुक्यात रस्त्यांची कामे करा : खा. शेट्टी

नवी दिल्ली (स्वाभिमानी वृत्तसेवा): कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा व शाहूवाडी तालुक्यातील डोंगराळी भागात अत्यंत्त खराब रस्ते, पाणी अशी दुरावस्था नाहीत. अनेक भागात अजूनही विजेची सोय नाही. ग्रामीण विकास योजनेतून माझ्या मतदारसंघातील पन्हाळा व शाहूवाडी तालुक्याचा विकास करावा, अशी जोरदार मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते खासदार राजू शेट्टी यांनी लोकसभेत केली.

लोकसभेत बोलताना खासदार राजू शेट्टी म्हणाले की, 'सह्यद्रीच्या कुशीत' या योजनेचा संपर्क आहे. आपल्या देशात आजसुध्दा अनेक गावात रस्ते नाहीत, अनेक गावात जाण्यासाठी पाईपलाईनसाठी व्यवस्थित पाणी नाही. अतीव स्थिती विजेची आहे. तरीसुध्दा आम्ही अभिमानाने सांगत आहोत की, आमचा देश पुढे चाललेला आहे.

लोकसभेतून

आर्थिक सर्वेक्षणामध्ये कृषी क्षेत्राचा दर २ टक्के विकास राखलेला आहे. याच्यामुळे ग्रामीण भाग कधी अपेक्ष पाणी परिषदे येते. आपले रस्तासारी उत्पन्न वाढत आहे. माझ आपल्या देशाचे कृषी क्षेत्र मागे पडत आहे. सेही अनारले सर्वच जण गावातल रावतात. आजही गावांगल्ये ना रस्ते आहेत, ना वीज आहे, ना शाळा आहे, ना दवाखाने आहेत, आणि गावातील लोकांना आरोग्य सुविधा पुरविली जात नाही. तरीही सरकार दावा करते आहे, की महात्मा गांधी रोजगार हमी योजनेअंतर्गत रोजगार निर्माण केले जात आहे. माझ हे सगळे व्यासपीठीय आहे. काल मुख्यत गावात रोजगारच मिळत नाही. त्यामुळेच गावकामील लोंढा शहरकडे वळती आहे.

माझ्या मतदारसंघात बहुतांश गावे अशी आहेत की, २० - २५ किलोमीटर पायी चालले लागत आहे. डोंगरच्या चनात रस्ते, वीज, पाणी यांची अजिबात सुविधा नाही. आम्ही जर जिल्हाधिकाऱ्यांना याबाबत विचारले तर पंतप्रधान सडक योजनेत ही गावे बसत नाहीत असी उत्तरे देतात. सरसा या भगत अनेक लहान लहान वाड्यावस्त्या आहेत. तिथे सर्वसाधारण शेतकरी रहात असून ५० ते १५० लोकांची वस्ती वसलेली आहे. त्यामुळेच त्या गावांना जोडण्यासाठी रस्तेच नाहीत. तेथील मुले शाळेत जाऊ शकत नाहीत. जर महिलांना उपचारासाठी दवाखान्यात जायचे असेल तर पायीच जावे लागते. झपली परिस्थिती पाहून जी पंतप्रधान योजनेची घाटी त्यात केलेली आहे त्यावर पुर्नविचार व्हावा. लहान शेतकऱ्यांना रोजगार हमी योजना अरुरो गहयावी आहे. गावात जर सुधारणा करायची असेल तर अजूनही यागल्ये बदलन केला पेला पाहिजे. राज्यले राज्यांना गिळून गिरळून नवा केले पाहिजे. शरकार नक्षत्रगावा विसलट लक्षणाची त्यारी करत आहे, गाव ग्रा राणव्या सुविधा गावातील लोकांना दिल्या पेलया नाहीत तर हे लोग जास्त दिवस गप्प बसणार नाहीत.

स्वाभिमानी विचार

Book-Post

प्रति,

RNI No. - MAH/MAR/2005/16213

Rgd. No. KLP/234/06/08

वर्ष ५ | अंक ११ | १ मे २०१० | किंमत ५ रुपये | पाने ४

RNI NO-MAHMAR/2005/16213
REGD NO - K.L.P./234/06/08

स्वाभिमानी विचार

संपादक : खासदार राजू शेट्टी

शेतकरी संघटना

अंकुर फुलवणारा कृषी महोत्सव

एक मे ते तीन मे हा स्वाभिमानी कृषी महोत्सवाचा दिवस म्हणजे उत्साहाचा, आनंदाचा शेतकऱ्यांच्या जीवनात एक नवा अंकुर फुलवणारा आहे. जयसिंगपूर सह पूर्ण शिरोळ तालुका, इचलकरंजी, हातकणंगलेसह कोल्हापूर जिल्ह्याचा सारा परिसर स्वाभिमानीच्या कार्यकर्त्यांच्या उत्साहाने भारलेल्या धावपळीने रोमांचित होऊ लागलाय. जयसिंगपूरमध्ये होणारा हा कृषीमहोत्सव शिरोळ तालुक्याला पहिलाच असल्यामुळे एक वाट पहायला लावणारी हवीहवीशी उत्सुकता संपूर्ण तालुकाभर शिगेला पोचली आहे. कृषी महोत्सव, कृषी प्रदर्शन, त्यातले वेगवेगळे स्टॉल्स्, स्वाभिमानी बाजारपेठ, पशु प्रदर्शन करमणुकीचे कार्यक्रम नि त्याच्याबरोबरच होणारे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे भव्य राज्यव्यापी अधिवेशन या साऱ्यांमध्ये काय पहायला मिळेल, काय ऐकायला मिळेल व मुख्य म्हणजे काय काय नवीन खरेदी करायला मिळेल याच्या चर्चा कट्ट्यावर रंगू लागल्यात.

परवाच स्वाभिमानीच्या कृषी महोत्सवाच्या कामासाठी मी, सुभाष शेट्टी आणि शैलेश चौगुले ४ – ५ दिवसांचा मुंबई – पुणे दौरा करून आलो.या दौऱ्यात पठारेसाहेब, खौसेसाहेब. एस. के. पाटीलसाहेब, अजित चौगुलेसाहेब या साऱ्यांची खूप मदत झाली. मुंबईत वेगवेगळ्या ठिकाणी संपर्क साधण्यासाठी जयसिंगपूरचेच पण सध्या वसईला रहात असलेल्या श्री महावीर चौगुले यांनी स्वतः परिश्रम घेऊन आमचे काम खूपच हलके केले. त्यांच्या रूपाने मुंबईसारख्या ठिकाणी स्वाभिमानीला आणखी एक जिव्हाळ्याचा जिवाभावाचा मित्र मिळाला. त्यांच्यामुळेच डॉ. देशमुख व डॉ. तिवारी या दोन अत्यंत बुध्दीमान शास्त्रज्ञांची भेट झाली. अनेक नव्या–क्रांतीकारक गोष्टी ऐकायला मिळाल्या. विशेष उल्लेख करावसा वाटतो तो आपल्याच शिरोळ तालुक्यातला राजापूरचा असलेला नि सध्या मुंबईत राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स मध्ये इंजिनियर असलेल्या राजू पटेलच! त्याने तीन चार दिवस केवळ आमची सोयच केली नाही तर अनेक महत्वाच्या कंपन्याबरोबर संपर्क साधण्यात स्वतः आघाडीवर राहून त्या त्या अधिकाऱ्यांशी कौशल्यपूर्ण संवादही साधला. त्यांच्यामुळे आमचा भार किती कमी झाला ते सांगणेच कठीण आहे. तरूण – तरतरीत, उत्साही नि बुध्दीमान असलेला हा राजापूरचा राजू भविष्यात एक दिवस आपल्या तालुक्याबरोबरच जिल्ह्याचेही नाव उज्वल करेल असे त्याच्याकडे पहाताना वाटून गेले. केवळ राजू शेट्टी आणि स्वाभिमानी शेतकरी संघटनेवरील प्रेमापोटी ही सारी मंडळी मनापासून कामात उतरली होती.

कृषी महोत्सवाच्या प्रदर्शनात बी – बियाणे, खते– पुरके, पशुखाद्ये, विद्युत पंप, ड्रीप – बीप, ट्रॅक्टर्स, कृषी अवजारे आदी तर असणारच पण त्याच्या जोडीला आता शेतकऱ्यांत्या मित्र झालेला मोबाईल, दुचाकी मोटारसायकल, चार चाकी गाड्या यांचेही स्टॉल्स् असणार. प्रदर्शनाचे खरेखुरे आकर्षण आहे ते सोलर सबमर्सिबल पंपाचे. सध्याच्या भारनियमनाच्या काळात पाणी आहे. तर वीज नाही व वीज असते तेव्हा पाण्याची टंचाई यावर मात करण्यासाठी केवळ सुर्यप्रकाशावर चालणारे सोलर पंपस् शेतकऱ्यांना वरदानच ठरतील असे वाटते. सध्या तरी स्ट्रीटलाईट इंजि लि. जैन पंपस् आणि किर्लोस्कर अशा मोजक्याच कंपन्या सोलर पंपाचे तंत्रज्ञान वापरून पंप बनविणारी कंपनी आहे. भविष्याचा वेध आता सोलरवरचे पाणी खेचणारे पंप शेती व घरगुती (बोअरींग सौर) वापरासाठीच्या क्षेत्रात अभूकपूर्ण क्रांती घडवणारी असतील यात शंका नाही. या सोलर पंपाचे काम प्रात्यक्षिकासह स्वाभिमानी कृषी महोत्सवात पहायला मिळेल.

कृषी महोत्सव हा ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी आणखी एक खास आकर्षण असणार आहे ते ते ऊस तोडणी मशीनचे सध्या शुगरकेन हार्वेस्टींग हा कृषी जगतात चर्चेचा विषय आहे. या वर्षीच ऊस तोडणी मजूरांच्या टोळ्या, कॉन्ट्रॅक्टर्स नि ट्रॅक्टर्सचे मालक या साऱ्यांनी शेतकऱ्यांचे तीन तेरा वाजवले. पुढच्या वर्षी तर टोळ्यांची संस्था आणखी कमी होईल नि दुसऱ्या बाजूला उसाचे क्षेत्र वाढतेच. या परिसरातील ऊस तोडणी वेळेत नि अत्यंत काटेकोरपणे व्हायची असेल तर शुगर हॉर्वेस्टींगला पर्याय नाही.

जॉन डियर, महिंद्रा, राणे, अग्रॉ यासारख्या चार–पाच कंपन्यांनी अत्याधुनिक अशी ऊस तोडणी यंत्रे विकसित केली आहेत. त्यातली काही यंत्रे स्वाभिमानीच्या कृषी महोत्सवात शेतकऱ्यांना पहायला मिळतील. ऊस तोडणीचा कारखाना व टोळ्या दोन्हीकडून होणारा त्रास पाहता ट्रॅक्टर्सचे मालक असलेले ४ – ५ स्वाभिमानी शेतकऱ्यांनी एकत्र येऊन एक ऊस तोडणी यंत्र घेतले तर अशी बरीच यंत्रे या भागात उपलब्ध होतील नि ऊस तोडणीचा प्रश्न बराचसा सुलभ होऊन जाईल. या ऊस तोडणीचा प्रश्न बराचसा सुलभ होऊन जाईल. या ऊस तोडणी यंत्रासंबंधी व्यवस्थित सविस्तर माहिती घेऊन के पाहण्याची संधी कृषी महोत्सवात शेतकरी अजिबात सोडणार नाहीत.

स्वाभिमानीच्या कृषी महोत्सवात हेच नव्हे तर असेच काही आगळेवेगळे बरे काही शेतकऱ्यांना बघायला मिळणार, अनुभवायला मिळणार. स्वाभिमानी शेतकरी राजा तयार रहा कारभारणीला घेऊन महोत्सवाला या!

संपादकीय

डॉ. महावीर अक्कोळे
mahaveerakkole@gmail.com

◆ वर्ष ५ ◆ अंक ११ ◆१ मे २०१० ◆ **संपादक : खासदार राजू शेट्टी** Email : rajushetti@gmail.com
◆ **कार्यकारी संपादक : डॉ. महावीर अक्कोळे ◆ सह संपादक : डॉ. श्रीवर्धन पाटील, जगदीश इनामदार,**
◆ **मानदसल्लागार : मा. श्री. अण्णा हजारे** राळेगणसिद्धी, **न्या. पी. बी. सावंत** पुणे, **न्या. बी. जी. कोळसे पाटील** पुणे, **. प्रा. शरद पाटील** सांगली, **कुमार सप्तर्षी** पुणे, **माजी आमदार. वामनराव चटप** चंद्रपूर ◆ **व्यवस्थापक : सुभाष शेट्टी**
◆ **कार्यालय :** भरत पतसंस्थेच्या माडीवर, पोलीस स्टेशनसमोर, जयसिंगपूर, ता. शिरोळ. फोन : (०२३२२) २२४३२७

SWABHIMANI VICHAR (Fortnightly) स्वाभिमानी प्रतिष्ठान संचलित पाक्षिक स्वाभिमानी विचार हे पत्र संपादक *खासदार राजू उर्फ देवाप्पा आण्णा शेट्टी यांनी स्वाभिमानी शेतकरी संघटना मध्यवर्ती कार्यालय, ९ वी गल्ली, राधाबाई रोड, पोलिस स्टेशनजीक, जयसिंगपूर–४१६ १०१, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर, (महाराष्ट्र राज्य) येथे प्रकाशित केले. प्रकाशन स्थळ : स्वाभिमानी शेतकरी संघटना मध्यवर्ती कार्यालय, ९ वी गल्ली, राधाबाई रोड, जयसिंगपूर–४१६ १०१, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर (महाराष्ट्र राज्य). दूरध्वनी : (०२३२२) २२४३२७. मुद्रण स्थळ : सुनील प्रिंटर्स, जयसिंगपूर. फोन (०२३२२) २२४३२७ पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी * यांची आहे. पाक्षिक स्वाभिमानी विचारमधील सर्व लेखांचे हक्क राखून ठेवण्यात आलेले आहेत. **Decleration No. Desk No. VII Home N.P.S.R./58/2005 RNI No. MAH/MAR/2005/16213 या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.**

वार्षिक वर्गणी
रु. १००/–

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अधिवेशन

दि. २ मे २०१०

प्रथम सत्र

वेळ - स. १० ते दु. १ वाजता

विषय: ग्रामीण .युवकांसमोरील आव्हाने

सहभाग : १) डॉ. प्रा. सुधीर पवार

२) श्री दत्तप्रसाद दाभोळकर

३) श्री, रविकांत तुपकर

४) डॉ. प्रा. जालंधर पाटील

जेवण १ ते २ वाजता

दुसरे सत्र

वेळ - दु. २ ते ५ वाजता.

विषय: शेती व्यवस्थेतील महिलांचे स्थान

सहभाग - १) वर्षा देशपांडे

२) अपर्णा रामतीर्थकर

३) सीमा पाटील

४) इतर उपस्थित प्रतिनिधी

चहापाणी - ५ ते ५.३० वा.

तिसरे पत्र

वेळ - सायं. ५.३० ते ८.३० वा.

विषय: छोटी राज्ये ग्रामीण विकासाचे मॉडल बनतील काय?

सहभाग - १) ॲड. निरूप (सुप्रिम कोर्ट) तेलगंणा

२) श्री. चंद्रकांत वानखेडे

३) श्री. अमर हबीब

४) गजाजन अहमदाबादकर

५) इतर उपस्थित प्रतिनिधी

रात्री ठिक ९.३० वाजता सप्तखंजिरीवादक श्री. सत्यपाल महाराज यांचे कितंन सत्यपालाची सत्यवाणी

दि. ३ मे २०१०

पहिले सत्र

वेळ: १० ते २ वाजता

विषय: आजची ग्रामीण अर्थव्यवस्था व वर्तमान राजकारणातील शेतकऱ्यांचे स्थान

सहभाग : प्रो. महेकसिंग (माजी आमदार व नाफा सदस्य-उत्तरप्रदेश)

२) टी. हक, माजी अध्यक्ष, कृषीमुल्य आयोग

३) डॉ. सुधीर पवार

४) आमदार पाशा पटेल

५) वसंत भोसले - ज्येष्ठ पत्रकार

जेवण २ ते ३ वाजता

दु. ३.३० वाजता सप्तखंजिरीवादक श्री. सत्यपाल महाराज यांचे कितंन सत्यपालाची सत्यवाणी

खुले अधिवेशन

वेळ - सायं. ४ वाजता सहभाग - टी. हक, अनिल सिंग

स्वामी करमपालजी, कवी इंद्रजित भालेराव

सुत्र संचालन - शब्दसम्राज्ञी स्वाती शिंदे-पवार, गजानन अहमदाबादकर

'स्वाभिमानी प्रतिष्ठान'च्या राज्यव्यापी कृषी प्रदर्शनाचे १ मे रोजी भव्य उद्घाटन

भरगच्च कार्यक्रम :परिसंवादासह विविध उपक्रमांचे आयोजन

जयसिंगपूर (स्वाभिमानी वृत्तसेवा): स्वाभिमानी प्रतिष्ठानच्यावतीने आयोजित राज्यव्यापी कृषी प्रदर्शनाचे उद्घाटन विदर्भातील शेतकरी चळवळीतील नेते चंद्रकांत वानखेडे यांच्या हस्ते दि. १ मे २०१० रोजी संपन्न होत आहे.

जयसिंगपूर नगरीला स्वाभिमानीचं रूप प्राप्त झालेले आहे. जयसिंगपूर महाविद्यालयाच्या पाच एकराच्या प्रशस्त आवारात हे कृषी प्रदर्शन भरविण्यात आलेले आहे. या प्रदर्शनामध्ये कृषी उत्पादने, कृषीपूरक उद्योग, सेंद्रिय खते, बि-बियाणे, प्लॉस्टिक उत्पादने, इरिगेशन पंपस् कृषी वित्त सहाय्य, कृषी विमा, जलसिंचन, कृषी विषयक, औद्योगिक उत्पादने, ॲग्रो ॲटोमोटिव्ह, टॅक्टर्स, ट्रॉलीज, तसेच पॉवर टिलर्स, फूड प्रॉडक्टस् शीत गृहे, वायनरी मशिन्स, हॉर्टी कल्चर, नर्सरी, शेतीमाल प्रक्रिया मशिनरी, पशु आणि पक्षी यांच्या आरोग्य विषयक उत्पादने अशा विविध कृषी पुरक संस्था तसेच कंपन्यांचे मॉल्स् उपलब्ध होणार आहेत. हे प्रदर्शन शहरातील आणि ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना एक नवी पर्वणी असेल.

कृषी प्रदर्शनाच्या उद्घाटनानंतर खासदार राजू शेट्टी यांचे अभिभाषण होणार आहे. सलग तीन दिवस असणाऱ्या कृषी प्रदर्शनात पहिल्या दिवसाच्या पहिल्या सत्रामध्ये शेतकरी आंदोलनाची सद्यस्थिती या विषयावर चर्चासत्र होणार असून यामध्ये राष्ट्रीय शेतकरी महासंघाचे नेते अनिल सिंग, बसवराज तंबाखे, यांच्यासह चंद्रकात वानेखेडे यांचा सहभाग आहे.

दुपारच्या सत्रामध्ये 'ग्रामीण भागातील शेतकरी व शेतमजुरांवर आजच्या शिक्षण व्यवस्थेचा पडणारा प्रभाव म्हणजेच शिक्षणाचे बाजारीकरण' या विषयावर आ. कपील पाटील डॉ. सुधीर पवार, गोपाळ पराजंपे, यांच्यासह भाग घेणार आहेत. तिसऱ्या होणाऱ्या सायंकाळच्या सत्रामध्ये साहित्य व प्रसार माध्यमातील शेतकरी यामध्ये कवी विठ्ठल वाघ, भास्कर चंदनशिवे, डॉ, रविंद्र ठाकूर, प्रा. शेषराव मोहिते, अभय मोकाशी, ज्येष्ठ पत्रकार दशरथ पारेकर यांचा सहभाग असेल.

२ मे रोजी होणाऱ्या दिवसभराच्या कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रामध्ये 'ग्रामीण युवकांसमोरील आव्हाने' या विषयावर डॉ. सुधीर पवार, दत्तप्रसाद दाभोळकर, रविकांत तुपकर, प्रा. डॉ. जालंधर पाटील यांचा सहभाग आहे. दुसऱ्या सत्रामध्ये शेती व्यवस्थेतील महिलांचे स्थान या विषयावर मार्गदर्शन आहे. वर्षा देशपांडे, अपर्णा रामतिर्थकर, सीमा पाटील, यांचा सहभाग असेल. तिसऱ्या सत्रामध्ये छोटी राज्ये, ग्रामीण विकासाचे मॉडेल बनतील काय? यामध्ये हैदराबाद उच्च न्यायालयाचे प्रसिध्द विधीतज्ञ ॲड. निरूप, चंद्रकांत वानखेडे, अमर हबीब, गजानन अहमदाबादकर हे मार्गदर्शन करणार आहेत. त्याच रात्री सप्तखंजिरीवादक सत्यपाल महाराज यांचे किर्तन होणार असून सत्यपालाची सत्यपाणी या विषयावर त्यांचे विवेचन होणार आहे.

३ मे रोजी होणाऱ्या कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रामध्ये 'आजची ग्रामीण अर्थव्यवस्था व वर्तमान राजकारणातील शेतकऱ्यांचे स्थान' या विषयावर कृषी मूल्य आयोगाचे तत्कालीन अध्यक्ष डॉ. टी. हक यांच्यासह उत्तरप्रदेशचे माजी आमदार प्रा. महेकसिंग, आमदार पाशा पटेल, तसेच ज्येष्ठ पत्रकार वसंतराव भोसले यांचा सहभाग असेल आणि यावर होणाऱ्या अधिवेशनामध्ये खासदार राजू शेट्टी, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष सदाभाऊ खोत, टी. हक कवी इंद्रजीत भालेराव, यांच्यासह स्वामी करम पालजी यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. या खुल्या अधिवेशनाकरिता देशभरातून किमान दोन अडीच लाख शेतकरी उपस्थित राहणार आहेत.